# मायबोली मेळावा वृत्त

वर्ष चौथे / वृत्त 3 २० सप्टेंबर २०१२
संपर्क: newsletter@mmtbusa.org



प्रदीर्घ उन्हाळ्याच्या सुट्टीचा मनसोक्त आनंद लुटल्यावर शाळा आणि शाळेबरोबर येणाऱ्या इतर व्यापांमधे नुकतेच स्थिरावेपर्यंत भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या मुहूर्तावर आपल्या लाडक्या गणरायांचे वाजतगाजत आगमन झालेसुद्धा. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, भारतातही नव्हे तर संपूर्ण जगभरातील भक्तमंडळी गणेशोत्सवाचा हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करीत आहेत. मग आपण टॅम्पावासिय तरी त्याला अपवाद कसे असू? घरोघरी वातावरण आरास, गणेशपूजा, आरत्या, यांनी मंगलमय झाले आहे यात शंकाच नाही.

**गजानना श्रीगणराया**
**आधी वंदू तुज मोरया !**

आषाढी एकादशी ते कार्तिकी एकादशी हे चातुर्मासातील दिवस म्हणजे सणासुदीचे, अगदी धामधूमीचे दिवस. आता लवकरच आपल्याला सर्वांना वेध लागतील ते दसरा आणि दिवाळीचे, खरं ना? मंडळी, तुम्हाला सांगायला अतिशय आनंद होतो आहे की यावेळी दिवाळीत चविष्ट फराळाबरोबरच मायबोलीने खास संगीताची मेजवानीहि ठेवली आहे. यंदाच्या आपल्या दिवाळीच्या उत्सवाचे प्रमुख आकर्षण असणार आहे **'सा रे ग म' स्पर्धा.** बृहन महाराष्ट्र मंडळ आयोजित या स्पर्धेमध्ये उत्तर अमेरिकेतील १२ मंडळांमधून प्राथमिक फेऱ्या घेतल्या जाणार आहेत. यातून निवड झालेले ६ अंतिम स्पर्धक बॉस्टनमधील BMM २०१३ च्या अधिवेशनात मुख्य व्यासपीठावरून आपली गायकी सादर करणार आहेत. अभिमानाची गोष्ट म्हणजे यातील एका प्राथमिक फेरीसाठी आपल्या मायबोलीच्या मंचाची निवड झाली आहे. तर मग येणार ना सर्व गानसेनांना भरभरून प्रोत्साहन द्यायला?

गजाननाच्या कृपेने व तुमच्या सर्वांच्या उदंड प्रेमाने तसेच मायबोली मेळावा कार्यकारिणी आणि स्वयंसेवक यांच्या अथक परिश्रमांमुळे आपल्या मंडळाने आत्तापर्यंत खूपच लक्षणीय प्रगती केली आहे. सणांच्या निमित्ताने येणाऱ्या उत्सवांव्यतिरिक्त मायबोलीने आयोजित केलेल्या आणि सक्रिय सहभाग घेतलेल्या कार्यक्रमांचे स्वरूप छायाचित्रांसकट मंडळाच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून श्री.अनिरुद्ध जोशी वेळोवेळी अगदी तत्परतेने आपल्यापर्यंत पोहोचवीत आहेत. अशा अनेक वैविध्यपूर्ण कार्यक्रमांच्या यशस्वी नियोजनामध्ये सिंहाचा वाटा आहे तो वेगवेगळ्या जबाबदाऱ्यांचे शिवधनुष्य उत्तमरितीने पेलणाऱ्या आपल्या निस्पृह कार्यकर्त्यांचा. २०१२ च्या अखेरीस आपल्या संचालक मंडळावरील काही सभासद निवृत्ती घेत आहेत. मायबोली मेळाव्याच्या निमित्ताने बांधल्या गेलेल्या आपल्यातील या रेशीमगाठी अधिक घट्ट होण्यासाठी तुमच्या सहकार्याची, सहभागाची नितांत गरज आहे. तेव्हा नेहमीच्या धकाधकीच्या व्यापांबरोबरच मंडळाच्या कार्यकारिणीसाठीही थोडासा वेळ दयायला तुमच्यापैकी अनेकजण उत्सुक असतील अशी अपेक्षा आहे.

आपल्या सर्वांतील एकजुटीची, प्रेमाची ही मंगल ज्योत सतत तेवत राहो हीच बाप्पा मोरयाच्या चरणी प्रार्थना.

आपली

**मेधा फडणीस**



**मायबोली मेळावा कार्यकारिणी २०११–१२**

**अध्यक्ष**
संजीव पोतदार

**उपाध्यक्ष**
देवदत्त बेंद्रे

**सचिव**
अनिरुध्द जोशी

**उप सचिव**
सुनील जाखडी

**कोषाध्यक्ष**
शैलेंद्र परांजपे

**उप कोषाध्याक्ष**
वर्षा कोलंबेकर

**सांस्कृतिक कार्यक्रम**
शीला केदार
वर्षा कोलंबेकर

**भोजन व्यवस्था**
रश्मी देशमुख
शिरीष घडे

**कार्यक्रम व्यवस्था**
शिरीष घडे

**मायबोली मेळावा वृत्त**

**संपादक:**
मेधा फडणीस

**सहसंपादक:**
रश्मी देशमुख

**मांडणी सजावट:**
नूतन कुलकर्णी
मंजुषा नाईक

**प्रकाशक:**
MMTB Inc



Courtesy: Rhea Pitale

**संगणकावर मराठीचा वापर.**

संगणकावर नागरी लिपीचा उपयोग करणे आता अतिशय सुलभ झाले आहे. मराठीतून लेखन आता Unicode मध्ये होते त्यामुळे एकाने लिहिलेला मजकूर दुसऱ्या संगणकावर पाठवल्यास तेथे व्यवस्थित दिसतो. मराठीत लिहिण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

www.google.com/transliterate/**marathi** या वेबसाईट वरून **Download Google Transliteration IME** या लिंकवर क्लिक करा आणि install करून घ्या.

मग Control Panel -> Regional and Languages वर जा. Keyboards and Languages मध्ये जाऊन Change Keyboards वर क्लिक करा. बहुधा English(United States)च फक्त दिसेल. Add वर क्लिक करून उघडलेल्या भाषांच्या यादीत Marathi (India) वर क्लिक करा. नंतर Keyboard वर क्लिक केले की मराठीसाठी दिसणाऱ्या keyboards पैकी google Input Tools वर क्लिक करून OK करा व नंतर क्रमाने सगळे स्क्रीन बंद करा. आता तुमचा कॉम्प्यूटर गूगलच्या सहाय्याने मराठीत लिहिण्यास सक्षम झाला आहे. डेस्कटॉपवर सर्वात खालच्या छोट्या ICONS च्या ओळीत EN अशी अक्षरे दिसतील. मराठी लिहावयाचे असेल तेव्हा तेथे क्लिक करून MA असे बदलून घ्या म्हणजे फोनेटिक पद्धतीने कोठेहि, English चे जागी मराठीत मजकूर टाइप करतां येईल.

या खटाटोपाला एक पर्याय आहे तो असा.

www.vishalon.net या वेबसाइट वरून pramukhIME हे पॅकेज Download and Install करा. ते फुकट मिळते! त्याचा ICON डेस्कटॉप वर करून घ्या. मराठी लिहिण्यासाठी केव्हाही प्रथम त्यावर क्लिक करून चालू करा (RUN). याच्या वापराने **कोणत्याहि भारतीय लिपीत** लिहिता येते. (मराठी, हिंदी व संस्कृत साठी एकच लिपि आहे.) डेस्कटॉपवर तळच्या लाइनीत pramukh चा छोटा icon दिसेल त्यावर क्लिक करून मराठी लिपी select करा. आता कोठेहि मराठी मजकूर फोनेटिक पद्धतीने टाइप करता येईल. लिहितानाच मराठी/इंग्रजी/मराठी बदलासाठी F12 किंवा पाहिजेतर F11 ही कळ वापरता येते. (मला F11 जास्त पसंत पडते.)
जी Phonetic पद्धत रोमन लिपीत मराठी लिहिताना वापरता तीच या दोन्ही appl. साठी उपयुक्त आहे. थोड्या सवयीने सर्व जोडाक्षरे, 'र' चे सर्व प्रकार, ऋ, ऍ, ऑ हि जमू लागतील.

pramukhIMEला पर्याय हवा असेल तर www.baraha.com या लिंकवरून barahaIME हे पॅकेज मिळेल तेहि असेच आहे व फुकटहि आहे, मात्र ते १० मिनिटांनंतर बंद होते व पुन्हा १० मिनिटानी चालू होते! पैसे मोजून घेतले तर अखंड चालेल! वापरावयास तेहि सुलभ आहे. मी स्वतः मात्र प्रमुख किंवा गूगल वापरतो.इतरहि अनेक पर्याय आहेत पण हे तीन मी स्वतः वापरले आहेत. इतर पर्यायांचा प्रत्यक्ष अनुभव नाही. असेच पर्याय Android (Paninikeypad marathi IME) आणि iPhone ( मराठी editor) साठी उपलब्ध आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

चला तर, हेंगाड्या रोमन लिपीचा हात सोडून द्या आणि आपल्या सुंदर नागरी लिपीतच लिहा. आपण मराठी माणसानीच ती वापरली नाही तर इतर कोण वापरणार आहे?

काही अडचण आल्यास pkphadnis@yahoo.com वर संपर्क साधा.

आपला,

श्री. प्र. के. फडणीस

## Announcement….

**MMTB committee is responsible for making the day to day decisions regarding it's various functions. Pretty soon we will have an election and Some of you will be able to join the new EC . However, all of us have an equal influence over MMTB activities and in that spirit, the EC is organizing an open house on October 14, 2012 (Sunday) between 2pm and 4pm . You all are invited to share your thoughts, opinions and ideas on 'everything MMTB' from youth involvement to new projects. This is an effort to seek participation and feedback from the community that will help and provide direction to the next EC. Let's all get together to make MMTB bigger and better.**

**Here is the address to the place ...**

**Jimmie B. Keel Regional Library**
**2902 W. Bearss Ave. Tampa, FL 33618-1828**

# RECOGNITION



**Congratulations to Dr. Eknath Naik on being nominated by MMTB and winning the community service award presented by F.I.A.,Tampa Bay on Aug. 19,2012.**

**Dr. Eknath Naik MD, PhD, MSPH,** is the Emergency Department staff physician at James A. Haley VA Hospital, Tampa. He is the Founder and Director of the USF-India Center for HIV/ AIDS Research and Training (CHART-India), and is an Associate Professor in the Department of Global Health at USF.

He developed the concept for establishing joint education and training centers between USF and various local organizations in India. Under this program, indian physicians are sponsored to USF's campus in Tampa for training in the latest methods of HIV diagnosis, management and prevention, and to learn treatment best practices. They then return to India to pass on their new knowledge to other physicians and nurses.

He is the founder of Community Resource Foundation (CRF), a not-for-profit charitable organization, in the state of Goa. CRF's mission is to enhance overall community development through provision of quality education, vocational training and access to health care to needy people. CRF provides observership and volunteer opportunities for US and International students and health care professionals. Several members of Tampa community are participating in this project.

Dr. Naik has played a major role in initiating and organizing free medical camp at Sanatan Mandir, Tampa, on behalf of MMTB. He is a great resource person and advisor for our community.
Email : enaik@hsc.usf.edu



**TGH transplant team commended by Tampa city council**

**Dr. Rajendra S. Baliga, M.D., F.A.C.P., F.A.S.N.,** is medical director of the pancreas transplant program at Tampa General Hospital and is the program director of the transplant nephrology fellowship program at the University of South Florida.

His clinical interests include all aspects of nephrology including general nephrology, dialysis, hypertension and transplantation. He is actively involved in teaching, and has a clinical appointment as assistant professor of medicine at the USF Health Morsani College of Medicine.
He is a member of several prestigious professional organizations, including the American Society of Transplantation, the American Society of Nephrology, and the Renal Physicians Association.

Members of Tampa General's organ transplant team accepted a commendation from the Tampa city council on June 7 in recognition of TGH's organ transplant program. TGH was recently ranked as the forth busiest transplant center in the country. Dr. Baliga is one of the honored members of this team.



**Sameer Naik Wins NSLI for Youth Scholarship to Study Language Abroad**

**Sameer Naik,** a student from Robinson High School, Tampa, has been awarded one of over 600 National Security Language Initiative for Youth (NSLI-Y) scholarships for 2012-2013. The NSLI-Y scholarship enables Sameer to study Hindi in India for six weeks of the summer. Through his participation in the program, Sameer will be in the vanguard of international communication and will develop the skills necessary to be a leader in the global community.

The NSLI-Y program is funded by the U.S. Department of State and provides merit-based scholarships for eligible high school students to learn less commonly-taught languages in summer and academic-year overseas immersion programs. NSLI-Y is administered by American Councils for International Education in Cooperation with multiple agencies across the globe and the University of Delaware. Applications for 2013-2014 NSLI-Y programs will be available at www.nsliforyouth.org in the early fall.

## CONGRATULATIONS TO THE GRADUATES OF 2012



Raunak Kedar graduated from Berkeley Preparatory School with AP Scholar with Distinction Award. He is also a National Honor Society member. He was accepted to University of Miami –School of Business with Dean's scholarship. He is planning to pursue studies in Finance and Business management. Raunak is an avid athlete and excelled in wrestling. He made it to several regional tournaments and was awarded "Outstanding Wrestler Award" in Marauder Varsity Duals-2012.



Gabriel Daniels graduated from Hillsborough High School IB Program with Honors. He was on the school Junior Varsity and Varsity Basket Ball team. He was also the President of the National Honors Society. Gabe loves to play piano and enjoys outdoor activities. He is now a freshmen at the University of Florida (UF) at Gainwesville. Go Gators !!!



Rucha Tandel Graduated from Wharton High School, with honors, class of 2012. She is now attending USF and currently studying Civil/Environmental Engineering. She also enjoys playing soccer, running, and cooking.



Salil Phadnis is a freshman at the University of Florida Honors College. He completed his IB diploma from Palm Harbor University High School and was also an AP Scholar with distinction. Salil was a finalist in the National Merit Scholarship Program for 2012. He is planning to pursue a career in medicine. Aside from studies, his interests include history, reading and music.



Ashwin Dewan graduated from the Palm Harbor University and completed his IB Diploma. He was also a 2012 finalist in the National Merit Scholarship program. Ashwin was accepted into the prestigious University of Pennsylvania and is pursuing a career in Business Management.

**Entrepreneurship by Mr. Uday Lele**: Innovative, driven and self-made describes Mr.Uday Lele. Mr. Lele was a key note speaker at Maitreya, Chicago as well as for entrepreneurs at Atlanta convention where he was presented a lifetime achievement award. He also received a lifetime achievement award on Capital hill. He has created successful businesses in eight industries and on four continents, every one as a start-up.

Mr Lele runs a website and free webinar/Q and A which have benefited over 600k entrepreneurs and students and is a course credit at major business schools in the USA. Please visit **www.udaylele.com** for more information.